## महत्वाचे

### श्री स्वामी समर्थ केंद्रामार्फत उद्या सत्संग सोहळा

**पारनेर (तालुका प्रतिनिधी)** – सुपा येथील श्री स्वामी समर्थ



केंद्रामार्फत उद्या (दि.२ डिसेंबर) सकाळी ११ वाजता श्री विठ्ठल रुक्मिणी मंगल कार्यालय, सुपा वाळवणे रोड येथे गुरुपुत्र चंद्रकांत दादा मोरे यांच्या उपस्थितीत सत्संग सोहळा व अमृततुल्य हितगुज असा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमास साधकांनी व नागरिकानी उपस्थित राहण्याचे आवाहन सुपा केंद्राच्यावतीने करण्यात आले आहे. या कार्यक्रमात मानवी जीवनाशी संबंधीत शेतशास्त्र, आयुर्वेद, विवाह संस्कार, मराठी अस्मिता, भारतीय संस्कृती, प्रश्नोत्तर बालसंस्कार, स्वयंरोजगार अशा विषयावर चंद्रकांत दादा मोरे मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमाचा पारनेर तालुक्यातील तसेच परिसरातील नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन केंद्राच्या सेवेकऱ्यांनी केले आहे.

### घरातून अल्पवयीन मुलाला पळविले

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – १४ वर्षीय अल्पवयीन मुलास राहत्या घरातून कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याची घटना २६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास केडगाव उपनगरात घडली. या प्रकरणी पीडित अल्पवयीन मुलाच्या वडिलांनी २९ नोव्हेंबर रोजी कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी यांचा अल्पवयीन मुलगा २६ नोव्हेंबर रोजी घरी होता. त्याला अज्ञात व्यक्तीने सायंकाळी पाचच्या सुमारास पळवून नेले. सदरची घटना फिर्यादीच्या लक्ष्यात आल्यानंतर त्यांनी मुलाचा शोध घेतला असता तो मिळून आला नाही. त्यांनी २९ नोव्हेंबर रोजी कोतवाली पोलिसांना माहिती दिली. पोलीस मुलाचा शोध घेत आहेत.

### दुचाकी-कार अपघात; वृध्देचा मृत्यू

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – कार व दुचाकीच्या अपघातात एका वृध्द महिलेचा मृत्यू झाल्याची घटना अहिल्यानगर- मनमाड महामार्गावर बुधवारी (२७ नोव्हेंबर) दुपारी ४:१० वाजेच्या सुमारास घडली. सरीता शरद मेहर (वय ६५ रा. संजिवनी बंगला, सारसनगर, अहिल्यानगर) असे मयत वृध्द महिलेचे नाव आहे. या प्रकरणी गिरीष यशवंत गारडे (वय ३१ रा. सचिन कॉलनी, सारसनगर) यांनी शुक्रवारी (२९ नोव्हेंबर) दिलेल्या फिर्यादीवरून कारवरील (एमएच १९ डीव्ही ८७२६) अज्ञात चालकाविरूध्द एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बुधवारी दुपारी सरीता या त्यांच्या मोपेड दुचाकीवरून विळद (ता. नगर) येथील विखे पाटील हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी जात असताना एमआयडीसी परिसरात मनमाड रस्त्यावर त्यांच्या दुचाकीला कारने धडक दिली. या धडकेत जखमी झालेल्या सरीता यांना उपचारासाठी येथील जिल्हा शासकीय रूग्णालयात दाखल केले असता तेथील डॉक्टरांनी त्यांची तपासणी करून त्यांना उपचारापूर्वीच मयत घोषीत केले. पोलीस उपनिरीक्षक जाधव अधिक तपास करत आहेत.

### अकाऊंट नंबर अद्यावतचे आवाहन

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – कर्मचारी भविष्य निर्वाह निधीसारख्या सामाजिक सुरक्षा प्रदान करणाऱ्या योजनांचा लाभ घेण्यासाठी कर्मचाऱ्यांनी युनिव्हर्सल अकाऊंट नंबर कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या युनिफाइड पोर्टलचा वापर करून अद्ययावत करण्याचे आवाहन कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या अहिल्यानगर कार्यालयाच्यावतीने करण्यात आले आहे. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी, पेन्शन योजना आणि कर्मचारी ठेव लिंक्ड विमा योजना या योजनांव्दारे अहिल्यानगर जिल्ह्यातील १ लाख २९ हजार ९९७ सदस्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना सामाजिक सुरक्षा कव्हर प्रदान करण्यात आले आहे. या योजनांचे नियंत्रण नाशिकच्या प्रादेशिक कार्यालयाव्दारे केले जाते. कर्मचारी ईएफपीओच्या लिंकवर जाऊन आपला युनिव्हर्सल अकाऊंट अद्ययावत करता येईल. अधिक माहितीसाठी ०२४१-२४११२७३ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# चेष्टामस्करीच्या वादातून मित्राचा कात्रीने भोकसून खून

## मुकुंदनगर मधील घटना; खून करणाऱ्याला पुण्यातून घेतले ताब्यात

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – शहरातील मुकुंदनगर भागात जिलानी मेडिकल जवळ शुक्रवारी (२९ नोव्हेंबर) सायंकाळी मित्रांमध्ये चेष्टामस्करीतून झालेल्या वादात एकाने युवकाला कात्रीने पाठीत भोसकले. यात जखमी युवकाचा उपचारादरम्यान शनिवारी सकाळी मृत्यू झाला. जिशान रूस्तमअली खान (वय १८, रा. घर नं. २३, इस्लामी बेकरीजवळ, दर्गा दायरा रस्ता, शहाजीनगर, मुकुंदनगर) असे मयत युवकाचे नाव आहे. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल झाला आहे.

मयत जिशानचा भाऊ नसीबअली रूस्तमअली खान (वय २५ रा. घर नं. २३, इस्लामी बेकरीजवळ, दर्गा दायरा रस्ता, शहाजीनगर, मुकुंदनगर) यांनी फिर्याद दिली आहे. शमशुद्दीन निजामुद्दीन खान (रा. मुकुंदनगर) असे गुन्हा दाखल झालेल्या संशयित आरोपीचे नाव असून त्याला भिंगार कॅम्प पोलिसांच्या पथकाने काल, शनिवारी दुपारी पुण्यातून ताब्यात घेतल्याचे सहाय्यक निरीक्षक जगदीश मुलगीर यांनी सांगितले. जिशान रूस्तम अली खान, शमशुद्दीन निजामुद्दीन खान, रेहान अब्दुलहक शेख, फैजान सोहराबअली खान हे चौघे मित्र एकमेकांची चेष्टामस्करी करत असताना शमशुद्दीन निजामुद्दीन खान यास राग आल्याने त्याने मेडिकलमधील काऊंटरवरील कात्री घेऊन जिशान रूस्तमअली खान याच्या पाठीत भोसकले. यात तो गंभीर जखमी झाला. त्याला खासगी रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्याचा शनिवारी सकाळी मृत्यू झाला.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती, भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक जगदीश मुलगीर यांनी घटनास्थळी धाव घेतली. पसार संशयित आरोपीच्या शोधासाठी पुण्याला पथक रवाना करण्यात आले. पथकाने शनिवारी सायंकाळी संशयित आरोपीला पुण्यातून ताब्यात घेतले. अधिक तपास सहाय्यक निरीक्षक मुलगीर करत आहेत.

## दिव्यांग दिनानिमित्त २ ते ७ डिसेंबरदरम्यान मदत सप्ताह

### दिव्यांग पुर्नवसन केंद्र व समाज कल्याण विभागाचा उपक्रम

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – डॉ. विखे पाटील फौंडेशन संचलित जिल्हा दिव्यांग पुर्नवसन केंद्र, जिल्हा परिषदेचा जिल्हा समाज कल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ३ डिसेंबर रोजी जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्यात येणार आहे. या निमित्ताने २ ते ७ डिसेंबर दरम्यान दिव्यांग मदत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा समाज कल्याण आधिकारी देविदास कोकाटे आणि दिव्यांग पुर्नवसन केंद्राचे संचालक डॉ. अभिजित दिवटे यांनी दिली.

या सप्ताहाच्या निमित्ताने २ व ३ डिसेंबर रोजी वयोवृध्द व दिव्यांग व्यक्तिंसाठी वडगाव गुप्ता येथे मोफत सहाय्यक साधने वाटपासाठी तपासणी शिबीर होणार आहे. ३ व ४ डिसेंबर रोजी शहरातील टिळक रस्ता येथील मतीमंद मुलांच्या शाळेत बौध्दीक दिव्यांगत्वाचे कारणे तपासणी व उपचार शिबीर आयोजित करण्यात आले आहे. ३ डिसेंबर रोजी जाणकीबाई आपटे मुकबधीर विद्यालयात दुपारी १२.३० ते १.३० वाजे दरम्यान दिव्यांगांकरीता विविध शासकीय योजना या विषयावर डॉ. दिपक अनाप हे मार्गदर्शन करणार आहेत. तसेच श्रवणयंत्र व एमआर किटचे वाटप करण्यात येणार आहे. आनंदऋषीजी अपंग कल्याण केंद्र व निवासी अपंग विद्यालय येथे सुधारात्मक शस्त्रक्रीयेसाठी तपासणी शिबीर या सप्ताहात आयोजित करण्यात आले असून, ४ डिसेंबर रोजी समग्र शिक्षा अभियाना अंतर्गत राहुरी येथील ग्रामीण रूग्णालयात भौतीकोपचार शिबीर, ५ डिसेंबर रोजी विखे पाटील स्पोर्ट अॅकेडमी येथे दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी क्रिडा स्पर्धा आयोजित केल्या आहे. ६ डिसेंबर रोजी प्रधानमंत्री दिव्यासा केंद्राचे उद्घाटन व दिव्यांग बांधवाना साहित्य वाटप होणार आहे. ७ डिसेंबर रोजी शालेय विद्यार्थ्यांमधील दिव्यांगत्व, शिघ्रहस्तक्षेप तपासणी व समुपदेशन यावर अमृता साठे यांचे मार्गदर्शन या शिबीराच्या निमित्ताने आयोजित करण्यात आले आहे.

## विखे पाटील कृषी महाविद्यालयात संविधान दिन साजरा



**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी महाविद्यालय, विळदघाट येथे संविधान दिन साजरा करण्यात आला. सदरील कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. बी. धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली संविधान प्रास्ताविकेच्या वाचनाने संपन्न झाला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मधुकर धोंडे यांनी अध्यक्षीय मनोगतात भारतीय संविधानाची वैशिष्ट्ये, महत्त्व व इतिहास, भारतीय लोकशाही करता भारतीय संविधानाची आवश्यकता याबाबतचे मार्गदर्शन उपस्थितांना केले. तसेच यावेळी मुंबई येथे झालेल्या २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यातील शहीद जवानांना अभिवादन देखील करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. किरण दांगडे यांनी केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. एस. बी. राऊत, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. डी. एम. नलावडे, सहयोगी प्रा. डॉ. एच. एल. शिरसाठ तसेच महाविद्यालयीन प्राध्यापक, प्राध्यापिका व शिक्षकेतर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. एस. बी. राऊत यांनी केले.

## विना रिफ्लेक्टर ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करा

### स्वाभिमानी शेतकरी संघटनेची मागणी

**शेवगाव (शहर प्रतिनिधी)** – प्रादेशिक परिवहन विभागाने (आरटीओ) ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या पाठीमागे रिफ्लेक्टर लावणे बंधनकारक केले आहे. मात्र, या आदेशाची पायमल्ली होत असल्याने थेट अपघाताला निमंत्रण दिले जात असून बेजबाबदार चालकांवर कारवाईची करावी अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे, परिसरातील साखर कारखान्यांचे हंगाम जोरात सुरू झाले आहे. त्यामुळे पुन्हा एकदा अपघातांना निमंत्रण ठरणाऱ्या रिफ्लेक्टर विना ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांचा मुद्दा ऐरणीवर आला आहे याबाबत स्वाभिमानी शेतकरी संघटनेने आक्रमक पवित्रा घेतला असून पोलिसांनी अशा वाहनावर कारवाई करावी.

ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर, ट्रॉली, ट्रक यांना रिफ्लेक्टर नाहीत. त्यामुळे अपघाताचा वाढता धोका असल्याने तालुका प्रशासनाने संबंधित साखर कारखान्यांना वाहनांना रिफ्लेक्टर बसवावेत, याकडे साखर कारखान्यांनी दुर्लक्ष केल्यास पोलीस प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारावा, शहरातील बस स्थानका नजीकचे क्रांती चौक, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, गाडगे बाबा चौक या परिसरात रात्रंदिवस वाहनांची मोठी वर्दळ असते. या परिसरात अनेकदा वाहतुकीची कोंडी सुरू असल्याने पायी चालणे देखील मुश्किलीचे ठरत आहे. त्यात आता ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांची भर पडलेली आहे. शहरातून ऊस वाहतूक रात्रीच्या वेळी करण्याची वारंवार मागणी करुनही प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केले आहे. अपघात टाळण्यासाठी सुरक्षितता व सतर्कता बाळगणे अत्यावश्यक आहे त्यासाठी साखर कारखान्यांनी पुढाकार घ्यावा, असेही निवेदनात म्हटले आहे.

## सोनईच्या तरूणाकडून नगरच्या तरूणीवर अत्याचार

### पैशांसाठी फोटो व्हायरल करण्याची धमकी

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – शहरातील एका उपनगरात राहणाऱ्या तरूणीवर सोनई (ता. नेवासा) येथील तरूणाने वारंवार अत्याचार केल्याचा प्रकार समोर आला आहे. पीडित तरूणीने या प्रकरणी शनिवारी (३० नोव्हेंबर) दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राहुल पद्माकर दरंदले (वय ३७, रा. कॉलेज रस्ता, सोनई) असे गुन्हा दाखल झालेल्या तरूणाचे नाव आहे.

फिर्यादीच्या लग्नासाठी तिच्या घरचे स्थळ शोधत असताना त्यांची राहुल सोबत ओळख झाली होती. मात्र त्या दोघांचे लग्न झाले नाही. सन २०२१ मध्ये फिर्यादी त्यांच्या घरी एकट्याच असताना राहुल घरी आला. त्याने 'मला तुझ्याशी लग्न करायचे आहे, माझे तुझ्यावर प्रेम आहे' असे म्हणून जबरदस्तीने शारीरिक संबंध केले. फिर्यादीने विरोध करून देखील त्याने अश्लिल फोटो काढले. त्यानंतर त्याने फिर्यादीला फोन करून पैशाची मागणी केली. पैसे दिले नाही तर फोटो व्हायरल करण्याची धमकी दिली. फिर्यादीने त्याला सुरूवातीला १० हजार व नंतर २० हजार रूपये दिले. त्याने अनेक वेळा फिर्यादीचे दुसऱ्या मुलासोबत जमलेले लग्न देखील मोडले. त्याने कारमध्ये (एमएच १७ एजे ५६५७) बसवून डोंगरगणच्या रस्त्याला नेऊन कारमध्येच बळजबरीने अत्याचार केला. जेऊर टोलनाक्याजवळील एका लॉजमध्ये घेऊन जावून अत्याचार केला. २२ नोव्हेंबर २०२४ रोजी रात्री साडेबारा वाजता फिर्यादीच्या घरासमोर येऊन फिर्यादीला व तिच्या नातेवाईकांना जीवे मारण्याची धमकी दिली असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. दरम्यान, हा सर्व प्रकार झाल्यानंतर पीडित तरूणीने काल, शनिवारी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी गुन्ह्याची नोंद केली असून अधिक तपास करत आहेत.

## ऊस दर जाहीर करा; भूमिपुत्र शेतकरी संघटनेची मागणी



**पारनेर (तालुका प्रतिनिधी)** – चालू हंगामाचा ऊस दर जाहीर करून मागील गाळप हंगामातील शिल्लक रक्कम शेतकऱ्यांना अदा करावी अशा मागणीचे निवेदन भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे अध्यक्ष संतोष वाडेकर यांच्या नेतृत्वाखाली माळकुप येथील ग्रीन एनर्जी लिमिटेड कारखान्याचे चेअरमन महेश करपे यांना देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे, २०२३-२०२४ या गळीत हंगामात मौजे देसवडे, मांडवे खुर्द आणि परिसरातून शेतकऱ्यांचा ऊस मोठ्या प्रमाणात माळकुप येथील ग्रीन एनर्जी लिमिटेड या कारखान्यास देण्यात आला होता. ऊसाची तोडणी करण्याअगोदर कारखान्याच्या एमडींनी गावागावात मीटिंग घेऊन शेतकऱ्यांना आश्वासन दिले होते की, तुमच्या ऊसाला इतर कारखान्याप्रमाणे दर देऊ पण मागील हिशोब बाकी असतानाच चालू हंगामातील ऊस तोड चालु केली आहे. शेजारील संगमनेर कारखान्याने अंतिम दर ३००० रुपये दर दिला असून आपणही उर्वरीत २०० रूपये टनाप्रमाणे शेतकऱ्यांना पैसे द्यावेत तसेच चालु वर्षीचा कारखान्याचा गळीत हंगाम सुरू झाला असून कारखान्याने कोणत्याही प्रकारे दर जाहीर न करता ऊस तोड चालु केली आहे त्यामूळे शेतकरी संभ्रमाअवस्थेत आहे तरी आपण चालु हंगामाचा दर जाहीर करून मगच ऊस तोड सुरू करावी. दोन्ही मागण्यांची दखल घेऊन शेतकऱ्यांना न्याय देण्यात यावा.

यावेळी सरपंच पोपट दरेकर, चेअरमन संतोष टेकुडे, दत्ता फटांगरे, मा. चेअरमन संजय भोर, अविनाश भोर, संतोष काकडे, संपत फटांगरे, अण्णा भोर, भाऊसाहेब खाडे, मंजाबापू वाडेकर, बाबासाहेब टेकुडे, रावसाहेब गोळे, महिपती दरेकर, नवनाथ जाधव यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

## वाडिया पार्कसह सहा क्रीडा संकुलांसाठी प्रत्येकी पाच कोटींचा निधी द्या

### खा. लंके यांची ना. मांडविया यांच्याकडे मागणी



**पारनेर (तालुका प्रतिनिधी)** – नगर शहरातील वाडिया पार्कसाठी वीस कोटी तर पारनेर, श्रीगोंदे, कर्जत, जामखेड व शेवगाव या तालुक्यांतील क्रीडा संकुलांसाठी प्रत्येकी पाच कोटींच्या निधीची मागणी खा. लंके यांनी केली असून हा निधीही मार्च महिन्यात मंजुर करण्याची ग्वाही केंद्रीय श्रम, रोजगार, युवा कार्यक्रम तथा खेळ मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी दिल्याचे खा. नीलेश लंके यांनी सांगितले.

नगर शहरातील वाडिया पार्क तसेच विविध तालुक्यांतील क्रिडा संकुल किंवा त्यात सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी खा. लंके यांनी नवी दिल्ली येथे खा. भास्कर भगरे यांच्यासह मंत्री मांडविया यांची भेट घेतली. नगर शहरातील वाडिया पार्क हे जिल्हयातील एकमेव प्रमुख क्रीडा संकुल आहे. या संकुलामध्ये काही सुविधांअभावी विस्तृत आणि मोठे क्षेत्रफळ असूनही या संकुलापासून खेळाडू उपेक्षित राहत आहेत. वाडिया पार्क विकसीत करून आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्यास एक गुणवत्तापुर्ण क्रीडा संकुल उभे राहील. त्या माध्यमातून विविध खेळांना प्रोत्साहन मिळू शकेल असा विश्वास खा. लंके यांनी यावेळी व्यक्त केला.

तसेच पारनेर, श्रीगोंदा, कर्जत, जामखेड, शेवगाव या तालुक्यांमधील क्रीडा संकुलांमध्येही विविध सुविधा उपलब्ध नाहीत. त्यामुळे क्रीडा संकुल असूनही ग्रामीण भागातील खेळाडूंना त्याचा लाभ घेता येत नाही. मंत्री मांडविया यांनी या मागणीचा विचार करून निधी मंजुर करण्याची मागणी खा. लंके यांनी यावेळी निवेदनाव्दारे केली.

खा. लंके यांच्या मागणीचा विचार करून येत्या मार्च महिन्यात ४५ कोटींच्या निधीला मंजुरी देण्याची ग्वाही मंत्री मांडविया यांनी दिल्याचे खा. लंके यांनी सांगितले.

## वृध्देश्वर विद्यालय उभारणार अद्ययावत क्रिडा संकूल

### डॉ. मरकड यांची माहिती; पालकांची सहविचार सभा

**तिसगाव (वार्ताहर)** – जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या मार्गदर्शनाखाली वृध्देश्वर विद्यालयाच्या पाठीमागील बारा एकर क्षेत्रामध्ये जिल्हास्तरीय अद्ययावत क्रीडा संकुल उभारण्यात येणार असल्याची माहिती डॉ. बाळकृष्ण मरकड यांनी दिली.





संस्थेच्या तिसगाव येथील श्री वृध्देश्वर विद्यालयात पालकांची शुक्रवारी सहविचार सभा आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी अध्यक्षीय भाषणात ते बोलत होते.

या संकुलामध्ये विविध क्रीडा मैदाने, तसेच जॉगिंग पार्क, धावण्याचा ट्रॅक चोहोबाजूने वॉल कंपाऊंड असे भव्य क्रीडा मैदान उभारण्याचे नियोजन असून यासाठी पालक, माजी विद्यार्थी सामाजिक राजकीय शैक्षणिक क्षेत्रातील सर्व पदाधिकाऱ्यांनी मदत करण्याचे आवाहन माजी सभापती काशिनाथ पाटील लवांडे, माजी विद्यार्थी शिक्षक नेते कल्याण लवांडे, विद्यालयाचे प्राचार्य संजय म्हस्के यांनी केले आहे.

तिसगावचे सरपंच इलियास शेख म्हणाले, ग्रामपंचायतचे सर्व पदाधिकारी तसेच स्थानिक सेवाभावी मंडळ यांचा पुढाकार घेऊन जास्तीत जास्त मदत विद्यालयास उपलब्ध करून देऊ आणि हे काम पूर्णत्वास नेण्यासाठी प्रयत्न करू.

या पालक-शिक्षक मेळाव्याप्रसंगी माजी सभापती काशिनाथ पाटील लवांडे, ज्येष्ठ नेते अरुण आठरे, अरुण रायकर, माजी शिक्षक साखरे, व्यापारी दिलीप गांधी, आबासाहेब काळे आदी उपस्थित होते.

प्राचार्य संजय म्हस्के, पर्यवेक्षक दादासाहेब मरकड, जाधव, राजेंद्र पवार यांनी ग्रामस्थांचे आभार मानले. या सभेची सांगता श्री वृध्देश्वर इंग्लिश मीडियम स्कुलच्यावतीने घेण्यात आलेल्या बाल आनंद मेळाव्याने झाली. इंग्लिश मीडियम स्कूलच्या शिक्षिका प्रमोदीनी साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

> वृध्देश्वर महाविद्यालयाच्यावतीने बारा एकर क्षेत्रामध्ये सर्व सोयी सुविधा युक्त असे भव्य क्रीडा संकुल उभारण्यात येणार असून यासाठी लाखो रुपये खर्च येणार आहे. माजी विद्यार्थ्यांसह पालक विविध क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांनी क्रीडा संकुल उभारण्यासाठी आर्थिक स्वरूपात मदत करून हातभार लावावा असे आवाहन विद्यालयाचे प्राचार्य संजय म्हस्के यांनी केले आहे.

## शहरातील धार्मिक स्थळी तोडफोड

### अज्ञात व्यक्तीविरूध्द गुन्हा दाखल

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – शहरातील अमरधाम रस्त्यावरील एका धार्मिक स्थळाची तोडफोड केल्याची घटना शनिवारी (३० नोव्हेंबर) सकाळी सहाच्या सुमारास उघडकीस आली. दरम्यान, शनिवारी सकाळी या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आशा टॉकीज पाठीमागे राहणाऱ्या व्यक्तीने फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे शुक्रवारी (२९ नोव्हेंबर) रात्री ८ वाजता धार्मिक प्रार्थन करून घरी गेले. दुसऱ्या दिवशी शनिवारी सकाळी ६ वाजता पुन्हा प्रार्थना करण्यासाठी गेले असता, त्यांना धार्मिकस्थळाचा दरवाजा उघडा होता. या परिसरात तोडफोड झाल्याचे दिसून आले. या ठिकाणी असलेले सीसीटीव्ही कॅमेऱ्याचीही तोडफोड करण्यात आली होती. या तोडफोडीने धार्मिक भावना दुखावल्या असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे.

दरम्यान, सदर घटनेची माहिती मिळाल्यानंतर परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली होती. पोलिसांना माहिती मिळाल्यानंतर शहर पोलीस उपअधीक्षक अमोल भारती, कोतवाली पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून तोडफोड करणाऱ्या संशयित आरोपीचा शोध पोलिसांची पथके घेत आहेत.